माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१६८३/२२/त.क्र.०७/२६/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१६८४/२४/त.क्र.०६/२६/०१**

श्रीमती विशाखा इंगळे / श्री.विनायक इंगळे
बी/६, अलंकार को.ऑप.हौ.सो.लि.मर्यादित
नविन टिळक नगर, चेंबूर (प), मुंबई -४०००८९.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा संचालकांचे लिपीक
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय, सावली इमारत,
गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई – ४०००१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक मुंबई
विकास विभाग चाळी यांचे कार्यालय, सावली इमारत,
गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई – ४०००१८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता जलकामे (सर्वेक्षण)
बृहन्मुंबई महानगरपालिका उप जल अभियंता (नि. व नि.) यांचे कार्यालय,
१ला मजला, वरळी यानगृह इमार, डॉ.ई.मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजल अभियंता (नि. व नि.)
बृहन्मुंबई महानगरपालिका उप जल अभियंता (नि. व नि.) यांचे कार्यालय,
१ला मजला, वरळी यानगृह इमारत, डॉ. ई.मोझेस रोड,
वरळी नाका, वरळी, मुंबई ४०० ०१८.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान /तत्कालिन जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

१६८३/२२, १६८४/२४ यात दिनांक २८/०६/२०२२ रोजी पारित आदेशात दोन वेगवेगळ्या आदेशांचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत तक्रारदार श्रीमती विशाखा इंगळे यांनी हा तक्रार अर्ज दाखल केला असून त्यांचा मूळ आक्षेप त्यांचे वकील श्री.जयेश भट यांनी दिनांक ०२/०५/२०१७ रोजी दिलेल्या नोटीसवर

jyotsna

करण्यात आलेली कार्यवाही तसेच सेवाविषयक व विशेषतः अलंकार गृहनिर्माण संस्था, टिळक नगर, चेंबूर, मुंबई येथील सहा सभासदांविषयी त्यांच्या सदनिका हस्तांतरण, विक्री या संदर्भातील माहिती मागितली असून दिनांक २८/०६/२०२२ रोजीच्या आदेशात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी उल्लेखित केलेल्या सहा सभासदांनी महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेण्यात आली आहे किंवा नाही याबाबत पंधरा दिवसात कळविण्याचे निर्देश दिले होते.

**अपील क्रमांक ५०२७/२०१९** यात अपिलार्थींना ॲडवोकेट श्री.जयेश भट यांनी संचालक बी.डी. डी. चाळ, चाळ विकास विभाग वरळी व व्यवस्थापक बी. डी. डी. चाळ वरळी यांना अग्रेषित केलेल्या पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती पंधरा दिवसात देण्याचे निर्देश दिले होते.

आज सादर केलेल्या खुलासात विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींना दिनांक ११/०७/२०२२ रोजी कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रानुसार माहिती पुरविण्यात येऊन अनुपालन अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल असे नमूद करीत उपस्थित राहण्याचे व माहितीचे अवलोकन करण्याचे पत्र निर्गमित केले होते मात्र अपिलार्थींनी कुठल्याही प्रकारची कागदपत्र बघितली नाहीत व स्वीकारली देखील नाहीत अशा स्वरूपाचा उल्लेख असलेले एक अधिकृत पत्र आज सादर करण्यात आले असून त्याच पत्राची प्रत ही तक्रारदार व प्राधिकरण दोघांनीही सादर केलेली आहे.

तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी ॲडवोकेट श्री.भट यांच्या कागदपत्रावर नेमकी कुठली कार्यवाही करण्यात आली याची कुठलीही माहिती न देता विषयाशी संबंधित नसलेली, दिशाभूल करणारी कागदपत्रे दाखविण्यात आली होती. याउलट प्राधिकरणाच्या वतीने विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे ही आज आयोगासमोर त्यांच्या अवलोकनार्थ त्यांनी चिन्हांकित केलेली माहिती, आदेशाप्रमाणे त्यांना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली असता त्यांनी माहिती स्विकारण्यास नकार देवून कुठल्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद दिला नसल्याचे नमूद केले आहे.

**तक्रार क्रमांक सहा यामध्ये :-**

प्रस्तुत प्रकारणी तक्रारदार श्री.विनायक इंगळे व विशाखा इंगळे यांनी दिनांक २८/०६/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात विशेषतः अपिलार्थिनी उल्लेखित केलेल्या सहा सभासदांनी महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेतली किंवा नाही याबाबत पंधरा दिवसात कळविण्याचे निर्देश दिले असून त्याचे अनुपालन झाले नसून देण्यात आलेली माहिती ही आदेशाशी पूर्णतः विसंगत असून अपिलार्थींनी त्यात महानगरपालिकेच्या भाडे तत्त्वावर करार अटी क्रमांकावर पंधरा दिवसात महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेण्यात आली आहे किंवा नाही अशी माहिती देणे अपेक्षित असताना प्रदान करण्यात आलेली माहिती केवळ हो किंवा नाही अशा स्वरूपात तयार करून दिलेली आहे.

माहिती अधिकार कायद्यात माहिती तयार करून देणे म्हणजेच information creation अपेक्षित नसून ज्या स्वरूपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरूपात माहिती देणे अपेक्षित आहे असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत आदेशाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता त्यातील परिच्छेदांमध्ये **खालील प्रमाणे नमूद केलेले आहे :-**

अपीलकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांच्या मूळ माहिती अर्जात अलंकार गृहनिर्माण संस्था, टिळक नगर, चेंबूर (प.) मुंबई येथील ६ सभासदांची नांवे उल्लेखित करण्यात आली आहेत त्या सभासदांनी त्यांची सदनिका हस्तांतरण / विक्री करण्यात आली आहे. तसेच त्यांना अशी माहिती अपेक्षित आहे की, महानगरपालिकेच्या भाडे तत्वावर करार अटी क्र.१५ नुसार महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेण्यात आली आहे किंवा नाही.

**मात्र त्यावर माननीय तत्कालीन मुख्य आयुक्त यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत :-**

"जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) सर्वेक्षण, श्री.विक्रांत देसाई यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्ता यांना उल्लेखित केलेल्या सहा सभासदांनी महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेण्यात आली आहे किंवा नाही याबाबत पंधरा दिवसात लेखी कळविण्यात यावे."

त्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विभागात उपलब्ध असलेल्या माहितीनुसार वरील सहा व्यक्तींच्या संदर्भात महानगरपालिका आयुक्त यांची पूर्व परवानगी घेतली किंवा कसे याबाबतीतील तपशील, तक्ता स्वरूपात प्रदान केलेला प्रथमदर्शनी आढळून येतो.

याबाबत तक्रारदार श्रीमती इंगळे यांच्या वतीने त्यांचे पती श्री.इंगळे यांनी आक्षेप घेतला असला तरी, उपरोक्त प्रकरणी दिनांक २८/०६/२०२२ रोजी निर्देशित केलेल्या आदेशाचे माहिती देण्याच्या प्रमाणे तक्रारदार यांना हवी असलेली माहिती सुलभ पद्धतीने देण्यात आली असून यासंदर्भातील संबंधित इसमांना परवानगी देण्यासंदर्भात अतिरिक्त कागदपत्रे ज्यामध्ये या व्यक्तींनी अथवा व्यक्तींच्या वतीने करण्यात आलेली विनंती व त्यावर घेण्यात आलेला निर्णय अथवा टिपणी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असल्यास आहे त्या स्वरूपात विनामूल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

## आदेश

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Maharashtra ★

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०६.०१.२०२६**

jyotsna